



दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25






अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १४३ । किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । १४/०६/२०२६ । पाने - ६


## शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करा

### रोहित पवारांच्या आंदोलनाला थोरातांचा पाठिंबा



पंढरपूर (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी आमदार रोहित पवार यांनी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. सध्याच्या गंभीर कृषी परिस्थितीत सरकारने या आंदोलनाकडे राजकीय दृष्टिकोनातून न पाहता शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेण्याची गरज आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात थोरात म्हणाले की, राज्यातील शेतकरी आज सर्वार्थाने अडचणीत सापडला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे, वाढत्या उत्पादन खर्चामुळे आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. अशा परिस्थितीत विविध नियम आणि अटींच्या कचाट्यात अडकवून तुटपुंजी मदत देण्यापेक्षा शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणारी सरसकट कर्जमाफी हाच प्रभावी उपाय ठरू शकतो. आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सुरू केलेल्या आंदोलनामागील भूमिका योग्य असल्याचे सांगत थोरात यांनी त्यांच्या मागणीशी आपण पूर्णपणे सहमत असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारने या विषयावर तातडीने आपली भूमिका जाहीर करावी आणि शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या वाढत्या अडचणी पाहता आता सरसकट कर्जमाफीशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही. सरकारने वास्तव परिस्थितीची जाणीव ठेवून सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहनही थोरात यांनी केले.

- रोहित पवार यांच्या आंदोलनाला मिळणारा वाढता पाठिंबा आणि त्यात आता बाळासाहेब थोरात यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याची भर पडल्याने शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.

## जून अर्धा संपला, तरी पावसाचा पत्ता नाही

### शेतकरी चातकाप्रमाणे आकाशाकडे डोळे लावून



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जून महिना अर्धा संपत आला, तरी अद्याप मान्सूनचे समाधानकारक आगमन झालेले नसल्याने संगमनेर, अकोलेसह संपूर्ण उत्तर नगर जिल्ह्यातील शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. दरवर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात हजेरी लावणारा पाऊस यंदा ११ जून उलटून गेल्यानंतरही बरसत नसल्याने सर्वांच्या नजरा आकाशाकडे खिळल्या आहेत. आभाळात ढगांची ये-जा सुरू असली तरी पावसाने मात्र पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांवर पाणी फिरत आहे.

खरीप हंगामाची तयारी पूर्ण करून बळीराजा आता अक्षरशः पावसाच्या एका सरीची वाट पाहत आहे. अनेक शेतकऱ्यांनी शेतांची मशागत करून ठेवली आहे. काहींनी कर्ज काढून बियाणे, खते आणि कीटकनाशकांची खरेदी केली आहे. मात्र पावसाअभावी पेरणी खोळंबली असून शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. पाऊस पडेल या आशेवर दिवस काढणारा शेतकरी आता चातक पक्ष्याप्रमाणे आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

ग्रामीण भागात परिस्थिती अधिक गंभीर बनत चालली आहे. भंडारदरा, निळवंडे, आढळा आणि पिंपळगाव खांड यांसारख्या महत्त्वाच्या धरणांमधील जलसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. अनेक लहान-मोठे तलाव, बंधारे, विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडल्या आहेत. गावागावातील पिण्याच्या पाण्याचे स्रोत आटल्याने महिलांना आणि नागरिकांना अनेक किलोमीटर पायपीट करून पाणी आणावे लागत आहे. काही भागात टँकर हेच एकमेव आधार बनले आहेत. पाण्यासाठी सकाळपासूनच विहिरी, हापसे आणि टँकरजवळ महिलांच्या रांगा लागत आहेत. जनावरांसाठी पाणी उपलब्ध करून देणेही शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. अनेक ठिकाणी गुरांसाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून पशुपालकांची चिंता वाढली आहे.

वाढत्या तापमानाने आणि उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत असून ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसाअभावी जमिनीतील ओलावा पूर्णपणे नष्ट झाला असून खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पेरणी उशिरा झाल्यास उत्पादन घटण्याची शक्यता असून त्याचा परिणाम पुढील काही महिन्यांत भाजीपाला, फळे, धान्य आणि इतर कृषी उत्पादनांच्या किमतींवर होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापनाच्या उपाययोजनांबाबत प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ग्रामीण भागात दीर्घकालीन पाणी नियोजनाचा अभाव असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून प्रत्येक वर्षी उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या संकटावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

हवामान विभागाने लवकरच मान्सून सक्रिय होण्याचा अंदाज व्यक्त केला असला तरी प्रत्यक्षात पावसाची प्रतीक्षा अधिकच लांबत आहे. येत्या काही दिवसांत जोरदार पाऊस झाला नाही, तर अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकरी, पशुपालक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यासह संपूर्ण ग्रामीण भाग आता एकाच आशेवर आहे.

ये रे ये रे पावसा, तुझ्याविना जीव कासावीस झाला; बळीराजाच्या डोळ्यातील आसवांना आता तुझ्याच सरींचा आधार आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्यातील शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. सर्व पात्र शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तातडीने आधार क्रमांक उपलब्ध करून घ्यावा तसेच आधार क्रमांकाशी चालू भ्रमणध्वनी क्रमांक संलग्न (लिंक) करून घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

राज्यातील नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट व इतर कारणांमुळे अनेक शेतकऱ्यांना पीक कर्जाची वेळेत परतफेड करणे शक्य झाले नाही. त्यामुळे थकबाकीदार शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याची बाब लक्षात घेऊन शासनाने पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे.

या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित करण्यात आलेल्या अल्पमुदत पीक कर्जांचा विचार करण्यात येणार असून, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे पात्र ठरणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. तसेच यापूर्वी महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आहे, त्यांनी 'एकरकमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते शासनाच्या कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी पात्र ठरतील. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

शासनाने आर्थिक शिस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष तरतूद केली असून, सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर (पान २ वर)

## विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर काँग्रेसचे बुधवारपासून देशव्यापी आंदोलन

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

नीट पेपरफुटीनंतर आता काँग्रेसने याविरोधात देशव्यापी आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. याची सुरुवात १७ जून रोजी कोटा येथून केली जाईल. राहुल गांधी १७ जून रोजी कोटा येथे एक विद्यार्थी संमेलन घेणार आहेत. या संमेलनात राहुल गांधी पेपरफुटी आणि तरुणांशी संबंधित मुद्द्यांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी या देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली. ते म्हणाले- राहुल गांधी देशातील विद्यार्थी आणि तरुणांसाठी सातत्याने आवाज उठवणारे एक विश्वासार्ह व्यक्तिमत्व म्हणून उदयास आले आहेत. कोटा नंतर १० जुलै रोजी प्रयागराज, ११ जुलै रोजी पाटना आणि १४ जुलै रोजी दिल्लीत विद्यार्थी संमेलने होतील.

वेणुगोपाल म्हणाले- विद्यार्थी संमेलनांमध्ये स्पर्धा परीक्षांचे उमेदवार, युवा संघटना, शिक्षक आणि पेपरफुटी घोटाळ्यांमुळे थेट प्रभावित झालेल्या सर्व लोकांना एकत्र आणले जाईल. ही मोहीम त्या लाखो तरुण भारतीयांच्या समस्या समोर आणेल ज्यांचे भविष्य पेपरफुटी, परीक्षेचा वाढता खर्च आणि एक निष्पक्ष पारदर्शक भरती प्रणाली नसल्यामुळे प्रभावित होत आहे. वेणुगोपाल म्हणाले की, या परिषदांमध्ये पेपरफुटी आणि भरती घोटाळ्यांमुळे प्रभावित झालेल्या तरुणांना त्यांचे अनुभव सामायिक करण्यासाठी व्यासपीठ मिळेल.

यावेळी पेपरफुटी घोटाळ्यांसाठी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्याची संधी देखील मिळेल. वेणुगोपाल म्हणाले- या देशव्यापी मोहिमेअंतर्गत देशभरात एनएसयूआय, युवक काँग्रेससोबत सर्व प्रदेश काँग्रेस समित्या आणि जिल्हा काँग्रेस समित्या विद्यार्थ्यांना एकत्र आणतील. विद्यार्थी आणि शिक्षकांशी संपर्क साधून पेपरफुटीविरोधात एकत्र येऊन सुधारणांवर भर दिला जाईल.











Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532

आजच संपर्क करा

24/7 Emergency Services

# अज्ञात मृतदेहाची ओळख पटेना

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पुणे-नाशिक महामार्गालगत असलेल्या आवाडा ओढा परिसरात एका अंदाजे ५० वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मृताची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. मृत व्यक्तीची उंची सुमारे पाच फूट पाच इंच असून अंगात हिरव्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व हिरव्या रंगाची फुल स्पोर्ट्स पॅन्ट आहे. केस पांढरे व विरळ आहेत. डोळे, नाक, तोंड तसेच चेहरा पूर्णतः कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख पटविणे कठीण झाले आहे. मृतदेह बराच काळ पडून असल्याने शरीराचा बहुतांश भाग कुजलेल्या अवस्थेत आढळून आला असून ओळख पटविण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी...

पान १ वरून - लाभ देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण तसेच ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य राहणार आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून, शासनामार्फत याबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील.

आधार क्रमांक, बँक खात्यांची माहिती किंवा ऑनलाइन नोंदणी अपूर्ण असल्यामुळे अनेक पात्र शेतकरी विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी आपले आधार क्रमांक, बँक खाते, भ्रमणध्वनी क्रमांक व जमीन नोंदी अद्ययावत करून घ्याव्यात. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद अद्ययावत करून ॲग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राजहंस दूध संघात 1350 किलोवॅट सौरऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ

संगमनेर -दूध हे महत्त्वाचे अन्न आहे. दुधाची शुद्धता आणि गुणवत्ता जपल्याने राजहंसचे राज्यभरात मोठे नाव आहे. दूध संघाचा विजेवरील होणारा खर्च टाळण्यासाठी राजहंस दूध संघाने टाटा कंपनीच्या सहकार्यातून उभारलेला सौर ऊर्जा प्रकल्प कौतुकास्पद असून दररोज १३५० किलोवॅट वीज निर्मिती होणार असल्याचे प्रतिपादन दूध संघाचे मार्गदर्शक तथा राज्याचे माजी कृषी व महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.



संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघात सौर ऊर्जा प्रकल्पाच्या शुभारंभ प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख हे होते. तर व्यासपीठावर आमदार सत्यजित तांबे, लक्ष्मणराव कुटे, आर.बी राहणे, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, व्हाईस चेअरमन राजेंद्र चकोर, ड नानासाहेब शिंदे, दूध संघाचे संचालक विलासराव वर्पे, संतोष मांडेकर, विलास कवडे, बबनराव कुऱ्हाडे, बादशहा वाळुंज, संजय पोकळे, विक्रम थोरात, विष्णू ढोले, रवींद्र रोहम, सौ प्रतिभाताई सोमनाथ जोंधळे, सौ. मंदाताई गोरख नवले, अविनाश सोनवणे, हौशीराम सोनवणे, सुभाष सांगळे, कन्सल्टंट विनीत शहा कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी, सौर ऊर्जा प्रकल्पाचे हर्षल सातव, सिद्धार्थ थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, राजहंस दूध संघाने गुणवत्ता व शुद्धतेतून राज्यभर लौकिक निर्माण केला आहे. यामध्ये दूध उत्पादकांनी अधिक स्वच्छता व शुद्धता वाढविण्याबरोबर परदेशी उत्पादकांबरोबर आपली स्पर्धा करावी. दूध हे अन्न असून लहान मुलांच्या मुखात जाणारे असते त्यामुळे प्रत्येकाने अधिक काळजी घेतली पाहिजे.

टाटा कंपनीच्या सहकार्यातून उभ्या राहिलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पातून दररोज १३५० किलो वॅट वीज निर्मिती होणार आहे. पुढील तीन वर्षात प्रकल्पावरील खर्चाची परतफेड झाल्यानंतर संघाला दीर्घकाळासाठी ही वीज उपलब्ध होणार आहे. पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक बचतीचा हा उपक्रम सहकार क्षेत्रासाठी दिशादर्शक ठरणारा असल्याचे ते म्हणाले याचबरोबर दूध संघाच्या वाटचालीमध्ये उत्पादकांबरोबर अनेक अधिकारी कर्मचारी यांचे मोठे योगदान राहिले असून सेवानिवृत्ती हा एक जीवनाचा टप्पा आहे. यापुढील काळात नवे क्षेत्र खुले होत असून प्रत्येकाने आनंदाने राहिले पाहिजे. अमृत उद्योग समूहातील सर्व संस्था अत्यंत चांगल्या सुरू असून या संस्थांमुळे अनेकांच्या जीवनात आनंद निर्माण झाले असल्याचे ते म्हणाले. आ .सत्यजित तांबे म्हणाले की, दूध संघाने अत्यंत स्तुत्य उपक्रम राबवला असून पुढील अडीच वर्षांमध्ये या प्रकल्पाचा खर्च वसूल होणार आहे. विजेवरील खर्चात मोठी बचत होऊन त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे .सौर ऊर्जा प्रकल्प प्रत्येकाने करावा असा हा उपक्रम असून या प्रकल्पाबाबत सरकारची काही चुकीचे धोरण आहे .याकडे लक्ष वेधावे लागेल असे ते म्हणाले.

तर चेअरमन रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श शिस्तीवर लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दूध संघाची वाटचाल सुरू आहे. सुमारे अडीच एकर परिसरामध्ये उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पातून दररोज १३५० किलोवॅट वीज निर्मिती होणार आहे. यातून दररोज ५२२० युनिट वीज निर्मिती होणार असून महिन्याला दीड लाख युनिट वीज तयार होईल . पुढील तीन वर्षांमध्ये प्रकल्पाचा पूर्ण खर्च पूर्ण होऊन १०० टक्के मोफत वीज दूध संघाला मिळणार आहे. त्यातून मोठी बचत होणार आहे. सर्व मंजूर्यांसह तीन महिन्यात हा प्रकल्प पूर्ण झाला असल्याचे सांगताना आगामी काळात दूध शुद्धतेवर अधिक भर द्यावा लागणार असून गाव पातळीवर सोसायटी यांनी गाय गोठा ते संघ प्रक्रिया पर्यंत दुधाची काळजी घ्यावी. दूध संघाने ४ लाख लिटरपर्यंतचा टप्पा पार केला असून आगामी काळात दूध संकलन वाढवण्यासाठी काम करावे याचबरोबर दूध संघाच्या वाटचालीमध्ये अधिकारी कर्मचारी यांचा मोठा वाटा असून हे सांघिक यश असल्याचे ते म्हणाले. यावेळी दूध कन्सल्टंट विनीत शहा यांनी गाय गोठा, सोसायटी यामधील स्वच्छता व विविध उपायोजनांबाबतची माहिती शेतकऱ्यांना दिली.

**दूध संघात दीर्घकाळ सेवा देणारे जनरल मॅनेजर जी.एस शिंदे, बाळासाहेब बडे, बाबासाहेब थोरात, साहेबराव खेमनर, गंगाधर बो-हाडे, रमेश कोळगे, विनायक वैद्य , वसंत थोरात, भाऊसाहेब आहेर, भानुदास घाडगे, भाऊसाहेब कानवडे ,बाळासाहेब गडाख, दौलत बटवाल, शरद गुंजाळ, भाऊ पाटील कोटकर, सोमनाथ लहारे या कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती निमित्त सन्मानचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला.**

# तुकाराम मुंढे पुन्हा ॲक्शन मोडमध्ये

## गुटखा विक्रेत्यांवर आता मकोका लागणार

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी जबाबदारी सांभाळताच, कारवाईचा धडाका सुरू केला आहे. गेल्या महिनाभरात तुकाराम मुंढेंनी एकापाठोपाठ एक कारवाया करत ३ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईनंतरही राज्यातील काही ठिकाणी अवैध गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांची विक्री होत असल्याने आता आयुक्त मुंढे आणखी ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. आता, उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचे तुकाराम मुंढेंनी म्हटलं. तुकाराम मुंढे यांनी चार्ज घेतल्यापासून अन्न व



औषध विभागाने राज्यभरात अनेक ठिकाणी धाडी टाकून भेसळीचा माल जप्त केला आहे. संबंधित विक्रेत्यांना अटक करुन त्यांच्यावर गुन्हेही दाखल झाले आहेत. वर्तमानपत्रात - खाद्यपदार्थ विकणारे विक्रेते अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या (एफडीए) रडारवर आले आहेत. खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून विकू नका, अशी सक्त ताकीदही खाद्यविक्रेत्यांना देण्यात आली आहे. आता, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित नेटवर्कविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (मकोका) लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना तुकाराम मुंढेंनी निर्देश दिले आहेत. उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांना हा नियम लागू असून मकोका कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाईल. मकोका गुन्हा दाखल करण्यासाठी आरोपीचा इतिहास पाहून आवश्यक त्या गुन्ह्यानुसार कारवाई केली जाणार, असल्याचे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थाचे उत्पादन, साठवून, वाहतूक , वितरण आणि विक्री करणाऱ्या संघटीत नेटवर्क विरोधात मकोका लागू करण्याचे आदेश तुकाराम मुंढेंकडून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. ही संघटित गुन्हेगारी आहे, त्यामध्ये विक्री करणारा आणि विकत घेणारा देखील जबाबदार आहे, अशी माहिती तुकाराम मुंढेंनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच, यामध्ये आमचे काही अधिकारी देखील इनवॉल्ड आहेत, असे आरोप होत आहेत. मात्र, याची देखील चौकशी आम्ही करतोय, अधिकारी जर सहभागी असल्याचे आढळले तर तुम्हाला सांगण्यात येईल, त्यांच्यावरही कारवाई केली जाईल, असा सज्जड दमच मुंढेंनी दिला आहे.

# अवैध गर्भलिंग निदान रॅकेटवर आणखी मोठा घाव

## वाघोलीतून आणखी एक सोनोग्राफी मशीन जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे - अवैध गर्भलिंग निदान चाचण्या आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणातील तपास दिवसेंदिवस अधिक व्यापक होत असून पोलिसांनी या रॅकेटवर आणखी एक मोठा घाव घातला आहे. वाघोली (पुणे) येथून अवैधरित्या गर्भलिंग निदानासाठी वापरले जाणारे आणखी एक सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आले असून या प्रकरणातील आरोपींची संख्या आणि गैरव्यवहाराचे जाळे राज्यातील विविध जिल्ह्यांपर्यंत पसरल्याचे तपासातून समोर येत आहे.

पोलिसांनी यापूर्वी अटक केलेला डॉक्टर अतुल अंकुश जाधव (रा. वाघोली, पुणे) हा बेकायदेशीर गर्भलिंग निदान चाचण्या करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती.

पोलीस चौकशीत डॉक्टर जाधव याने मेडिकल साहित्य पुरवठादार आरोपी नरेंद्र ठाकरे याच्याकडून बेकायदेशीरपणे सोनोग्राफी मशीन खरेदी केल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलीस पथकाने आरोपीला सोबत घेऊन वाघोली येथे छापा टाकला असता गर्भलिंग निदानासाठी वापरले जाणारे सोनोग्राफी मशीन हस्तगत करण्यात आले. या मशीनच्या सहाय्याने वाघोली परिसरात अवैध गर्भलिंग निदान चाचण्या सुरू असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेले डॉक्टर, एजंट, मेडिकल चालक आणि इतर आरोपींकडून मिळालेल्या माहितीसह तांत्रिक तपासादरम्यान अनेक तालुके आणि जिल्ह्यांमध्ये एजंटांचे जाळे सक्रिय असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे या रॅकेटची व्याप्ती अपेक्षेपेक्षा अधिक मोठी असल्याचे समोर येत आहे.



आतापर्यंत २१ आरोपी अटकेत - या गंभीर गुन्ह्यात आतापर्यंत एकूण २१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्यामध्ये तब्बल ७ डॉक्टरांचा समावेश आहे. याशिवाय ३ मेडिकल चालक आणि वैद्यकीय साहित्याचा मोठा पुरवठादार असलेल्या एका आरोपीलाही अटक करण्यात आली आहे.

६ सोनोग्राफी मशीन, ५ वाहने जप्त - तपासादरम्यान राज्यातील विविध ठिकाणांहून आणि वेगवेगळ्या आरोपींकडून अवैध गर्भलिंग निदानासाठी वापरण्यात येणारी एकूण ६ सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात

### आतापर्यंत 21 आरोपी गजाआड

आली आहेत. तसेच ४ चारचाकी वाहने आणि १ दुचाकीही पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

तपासाचा पुढील भर हा बेकायदेशीर गर्भपात करणारे संशयित डॉक्टर, दवाखाने तसेच या संपूर्ण रॅकेटमध्ये कार्यरत असलेल्या एजंटांच्या साखळीवर राहणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचा तपास अत्यंत गांभीर्याने आणि बारकाईने सुरू असून आणखी धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या संपूर्ण कारवाईचा तपास अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी भारती आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक आठरे हे करीत आहेत.

# रामराव महाराजांच्या वाणीतून रामकथा ऐकणे हा अमृतयोग - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ह. भ. प. रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांनी मागील ४० वर्षात राज्यात आणि देशात आपल्या श्रवणीय वाणीतून रामायण कथा सांगितली आहे. त्यांची रामायण कथा ऐकणे हा अमृत योग असून गगनगिरी महाराजांचा सप्ताह अत्यंत भव्य दिव्य आणि अभूतपूर्व होत आहे. यावर्षी अलनिनोचा प्रभाव कमी होऊन सर्वत्र चांगला पाऊस होऊन शेतकरी व नागरिक सुखी समाधानी होऊ दे अशी प्रार्थना यावेळी राज्याचे माजी महसूल व कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी परमपूज्य स्वामी गगनगिरी महाराज व परमेश्वराकडे केली.

गुंजाळवाडी येथे सुरू असलेल्या परमपूज्य विश्व विभूषित स्वामी गगनगिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताह रामायण कथेला उपस्थित राहून त्यांनी आरती केली यावेळी ते बोलत होते. यावेळी रामायणाचार्य हरिभक्त परायण रामराव महाराज ढोक, आमदार सत्यजित तांबे, नगराध्यक्ष डॉ.मैथिलीताई तांबे, आयोजक आबासाहेब थोरात, दिलीपराव शिंदे,कपिल पवार यांच्यासह राजेंद्र गुंजाळ, हेमंत राजे पवार, नवनाथ आरगडे, सरपंच अमोल गुंजाळ, यांच्यासह संगमनेर तालुक्यातील विविध मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, हरिभक्त परायण रामराव महाराज ढोक यांच्या सुश्राव्यवाणीतून राम कथा ऐकणे हा अमृत योग आहे. महाराजांनी मागील ४० वर्षात देशात आणि राज्यांमध्ये विविध ठिकाणी रामायण कथेच्या माध्यमातून अध्यात्मिक सेवा केली आहे. वाणीवर प्रभुत्व आणि सहजपणे सांगण्याची पद्धत यामुळे कितीही वेळा रामायण ऐकले तरी पुन्हा प्रत्येकाला ऐकावे वाटते. प्रत्येकाच्या मनात घर करून ते राहते. गुंजाळवाडीच्या परिसरामध्ये अत्यंत भव्य दिव्य पद्धतीने गगनगिरी महाराज यांच्या आठव्या सप्ताहाचे आयोजन होत असून सर्व आयोजक कार्यकर्त्यांचे अभिनंदन आहे. अत्यंत उत्कृष्ट व्यवस्था सर्व भाविकांची केली आहे. हे एक आनंदाचे पर्व आहे. या आध्यात्मिक आनंदाचा अनुभूती सर्वांनी घ्यावी. याचबरोबर यावर्षी अलनिनोचा प्रभाव असल्याने पाऊस कमी पडतो की काय अशी भीती निर्माण झाली आहे. पावसाळा सुरू झाला आहे अद्याप पाऊस नाही. मात्र ईश्वराच्या आशीर्वादाने अलनिनोचा प्रभाव कमी होऊन संपूर्ण राज्यात व देशात चांगला भरपूर पाऊस पडू दे. शेतकरी व सर्वसामान्य नागरिक सुखी होऊ दे. अशी प्रार्थना त्यांनी गगनगिरी महाराज व ईश्वराकडे केली असून कारण पाऊस पडला तर सर्व सुखी समाधानी असतात असे ते म्हणाले.

तर हरिभक्त परायण रामराव महाराज ढोक म्हणाले की, संगमनेर तालुक्यामध्ये रामायण कथेची सुरुवात ही लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी ३५ वर्षांपूर्वी सुरू केली. यावेळी त्यांनी आपल्या श्रवणीय वाणीतून राम कथेचे निरूपण केले. तर आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, रामराव महाराज ढोक हे अत्यंत साध्या सोप्या आणि सर्वांना समजेल अशा भाषेमध्ये रामायण सांगतात त्यामुळे ते सर्वांना फार आवडते. यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते परमपूज्य गगनगिरी जी महाराज यांची आरती करण्यात आली. अत्यंत मोठ्या संख्येने भाविक भक्तगण यावेळी उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ बसचे स्टेअरिंग आमदार अमोल खताळ यांच्या हाती

## नव्या जिजाऊ बसचे लोकार्पण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर आगारात नुकत्याच दाखल झालेल्या नवीन 'राजमाता जिजाऊ' बसचे स्टेअरिंग स्वतः हातात घेत काही काळ बस चालवत नवीन बस चालविण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

आमदार अमोल खताळ पाटील यांनी राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची मुंबई येथे भेट घेत संगमनेर आगारासाठी मंजूर असले ल्या एसटी बसेस द्याव्यात अशी मागणी केली तात्काळ परिवहन मंत्र्यांनी दखल घेत संगमनेर आजारासाठी पाच नवीन राजमाता जिजाऊ तसेच दिल्या. यांच्या हस्ते लोकार्पण झाले

महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तवयांनी आमदार अमोल खताळ यांनी स्वतः राजमाता जिजाऊ बसचे स्टेरिंग हातात घेत बस चालविल्याने उपस्थित प्रवासी, अधिकारी आणि कार्यकर्ते आश्चर्यचकित झालेसंगमनेर बसस्थानकातून सुरू झालेली ही बस नाशिक रोड मार्गे निमोण नाका पर्यंत जाऊन पुन्हा संगमनेर बसस्थानकात परत आली. या प्रवासादरम्यान आमदार खताळ यांनी या जिजाऊ बस मध्ये असणाऱ्या सुविधांची पाहणी केली तसेच चालक व वाहकांशी संवाद साधत प्रवासी सेवांबाबत माहिती घेतली.या विशेष प्रवासात संगमनेर आगाराचे आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड यांच्यासह शिवसेना-महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. आमदार अमोल खताळ पाटील यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी शासना कडून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहे नवीन बसचे स्टेअरिंग आमदार खताळ यांनी स्वतः हातात घेतल्या मुळे उपस्थितांनी त्यांच्या नावाचा जयजयकार करत टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. आगार परिसरात या अनोख्या उपक्रमाची दिवसभर चर्चा रंगली होती. नवीन 'जिजाऊ' बसच्या माध्यमातून संगमनेर आगाराच्या ताफ्यात आणखी एका आधुनिक बसची भर पडल्याने प्रवाशांमध्येही समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# सोमवारी वाजणार शाळेची पहिली घंटा

## शाळांमध्ये पहिल्या दिवशी रंगणार प्रवेशोत्सव आणि खेळाचा तास



मुंबई (वृत्तसंस्था)

शाळेची आगामी शैक्षणिक वर्षाला सुरुवात होणार असून, सोमवारी (१५ जून) पहिली घंटा वाजणार आहे. विद्यार्थ्यांच्या स्वागताची जय्यत तयारी शाळा व्यवस्थापनाने केली आहे. यंदा प्रथमच सुमारे २० हजार विद्यार्थी शाळेत प्रवेश करणार आहेत. या विद्यार्थ्यांसाठी स्वागत महोत्सव प्रत्येक शाळेत आयोजित केला जाईल. त्यानंतर पहिलाच तास खेळाचा असणार आहे. जिल्हा परिषदेच्या साडेतीन - हजारांहून अधिक शाळांमध्ये ही तयारी सुरू आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी महिनाभरापूर्वीच पावसाळापूर्व नियोजनाबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, गेल्या आठवडाभरापासून शाळांमध्ये साफसफाई आणि अन्य तयारी पूर्ण करण्यात आली आहे. १५ जून २०२६ रोजी हा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या १९ मे २०२६ च्या निर्देशानुसार, या दिवशी क्षेत्रीय यंत्रणेमार्फत विविध शाळांमध्ये अधिकारी भेटींचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने लोकप्रतिनिधींसह जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपजिल्हाधिकारी आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विविध शाळांना भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान अधिकारी विद्यार्थ्यांचे स्वागत करतील, तसेच पालक सभांच्या माध्यमातून पालक, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी संघाच्या सदस्यांशी संवाद साधतील. या चर्चामध्ये विद्यार्थ्यांचे शिक्षण, शाळेची गुणवत्ता, नियमित उपस्थिती, शैक्षणिक प्रगती आणि शाळांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच, पालक व विद्यार्थ्यांच्या अपेक्षा, सूचना आणि अडचणी जाणून घेऊन त्यावर सकारात्मक चर्चा केली जाईल.

प्रवेशोत्सवाचे नियोजन करताना शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढली जाईल आणि नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले जाईल. विद्यार्थ्यांना शाळेविषयी आत्मीयता वाटेल असे विविध उपक्रम या दिवशी राबवण्यात येणार आहेत. याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तके देण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय यंत्रणेमार्फत सुरू आहे.

# घारगाव पोलीस ठाण्यात खांदेपालट

## हेमंत थोरात यांची बदली; बाबासाहेब बोरसे नवे प्रभारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्याच्या पठारभागाचे मुख्य केंद्र असलेल्या आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानल्या जाणाऱ्या घारगाव पोलीस ठाण्यात अखेर मोठा प्रशासकीय खांदेपालट झाला आहे. या पोलीस ठाण्याची स्थापना झाल्यापासून येथे पोलीस निरीक्षक दर्जाचे पद मंजूर आहे. मात्र, तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी या नियमाला बगल देत सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्याकडे या ठाण्याची जबाबदारी सोपवली होती. थोरात यांचा हा कार्यकाळ पठार भागासाठी अत्यंत निराशाजनक आणि कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडवणारा ठरल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये आहे. अखेर थोरात यांची अहिल्यानगर येथील एमआयडीसी पोलीस ठाण्यात बदली झाली असून, त्यांच्या जागी अहिल्यानगर शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी घारगाव पोलीस ठाण्याचा कार्यभार सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्याकडे दिला खरा, मात्र ते पठार भागातील कायदा व सुव्यवस्था राखण्यात सपशेल अपयशी ठरले. त्यांच्या कार्यकाळात घारगाव परिसरातील गुन्हेगारीने उच्चांक गाठला होता. पठार भागात अनेक गंभीर गुन्हे घडले. मात्र, यातील बहुतांश गुन्ह्यांचा अद्यापपर्यंत छडा लावण्यात घारगाव पोलिसांना यश आलेले नाही. पोलिसांच्या या सुमार कामगिरीमुळे तपास फाईल बंद पडल्यासारख्या झाल्या असून गुन्हेगारांचे मनोबल मात्र वाढले आहे. गेल्या काही महिन्यांत दुर्गम गावांमध्ये चोऱ्या, घरफोड्या, शेती पंपांची चोरी आणि अवैध धंद्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला होता. या बेकायदेशीर कृत्यांवर वचक निर्माण करण्यात थोरात यांचे प्रशासन पूर्णपणे हतबल ठरल्याचे पाहायला मिळाले. यामुळे स्थानिक जनतेत तीव्र असंतोष होता. या सर्व पार्श्वभूमीवर घारगावला पुन्हा एकदा मूळ मंजुरीनुसार पूर्णवेळ पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी मिळावा अशी मागणी होत होती. त्यानुसार आता बाबासाहेब बोरसे यांच्या रूपाने अनुभवी अधिकारी घारगावला मिळाला आहे.

# लोकशाही वाचवण्यासाठी समविचारी पक्षांनी एकत्र यावे - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)--संगमनेर - काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांची विचारधारा एकच आहे. दोन्ही पक्षांच्या विचारधारेमध्ये फरक नाही. ज्येष्ठ नेते खासदार शरदचंद्रजी पवार हे कधीही प्रतिगामी विचारधारा स्वीकारणार नाही. देशाची लोकशाही व संविधान धोक्यात आले असून ते वाचवण्यासाठी सर्व लोकशाही मानणाऱ्या समविचारी पक्षांनी एकत्र आले पाहिजे असे मत महाराष्ट्र काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले आहे.

संगमनेर येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या काँग्रेसमध्ये विलीनीकरणाबाबत माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना काँग्रेसचे माजी प्रांताध्यक्ष लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची विचारधारा एक आहे. लोकशाही ,राज्यघटना, संतांचा, बहुजनांचा आणि पुरोगामी विचार असलेली ही विचारधारा आहे. आमच्या विचारधारेमध्ये फरक नाही. ज्येष्ठ नेते शरदचंद्रजी पवार साहेब कधीही प्रतिगामी विचारधारा स्वीकारणार नाही असे माझे मत आहे.

ही लढाई विचारधारेची आहे. सध्या देशांमध्ये लोकशाही, संविधान धोक्यात आले आहे. न्यायव्यवस्थेवर दबाव आहे, पत्रकारितेमध्ये आपल्या देशाचा नंबर आता १५७ वा आहे. निवडणूक आयोगाबद्दल काय बोलणार. अशी सगळी परिस्थिती असताना लोकशाही आणि संविधान मानणाऱ्या सर्व पक्षांनी पहिला देश आणि लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र आले पाहिजे. आणि ती जबाबदारी आपल्या सगळ्यांची आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये दोष असतात पण दोष किती असावे याचे प्रमाण असते. आता फक्त दोष शिल्लक राहतात की काय अशी अवस्था सध्या सरकार आणि राजकारणामध्ये आहे. जास्त दोषांमुळे चांगले शोधण्याची वेळ आली आहे. पूर्वी दोष शोधले जायचे आता चांगले शोधावे लागत आहे. याचबरोबर सध्याचे राजकारण हे दुर्दैवी असल्याचे ते म्हणाले अहिल्यानगर जिल्ह्यामधून संधी मिळालेल्या लोकप्रतिनिधींनी जिल्ह्याच्या विकासाकरता जास्तीत जास्त निधी आणावा. याचबरोबर नाशिक पुणे रेल्वे जी थांबवली गेली आहे .

# ऑफलाईन पर्यायी व्यवस्था द्या - ग्राहक पंचायत

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले आदिवासी तालुक्यामध्ये शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर लागू केलेल्या नव्या जीपीआर (गव्हर्नमेंट प्रोसेस रि. इंजिनिअरींग) प्रणाली मुळे अकोले आदिवासी तालुक्यात सेतू केंद्र व महा ई. सेवा केंद्रांमध्ये सॉफ्टवेअर बंद पडत असल्यामुळे ऑफलाइन दाखल्यांना मान्यता देण्या बाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे तहसिलदार डॉ. सिध्दार्थ कुमार मोरे यांना दिल्याची माहिती जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलिक,तालुका अध्यक्ष देत्ता शेनकर, कार्याध्यक्ष महेश नवले यांनी दिली.

निवेदनात पुढे म्हटले आहे की अकोले आदिवासी तालुक्यामध्ये 'महा ऑनलाइन' चे सॉफ्टवेअर दुरुस्त होई पर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून ऑफलाइन दाखल्यांना मान्यता देण्यात यावी.

अहिल्यानगर जिल्हयातील अकोले तालुका आदिवासी अति दुर्गम भौगोलिक दृष्ट्या मोठा असून अनेक गरीब विद्यार्थी पायपीट करून शिक्षण घेत आहे.

१.सर्व्हर डाऊन असणे, लॉगिन न होणे आणि कागदपत्र अपलोड न होणे अशा तांत्रिक त्रुटींची कारणे पुढे केली जात आहेत परिणामी सन २०२६ शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ११ वी प्रवेशासह पदवी व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रा अभावी प्रवेश नाकारने जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

२.महाविद्यालयीन प्रवेश, शिष्यवृत्ती, नोकरी भरती सह विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक दाखले वेळेत मिळत नाही अधिवास व राष्ट्रीयत्व इतरही दाखल्यासाठी पडताळणी प्रक्रिया आधिक कठोर करण्यात आली आहे.

३.दाखल्या अभावी शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भिती पालक, विद्यार्थ्यांमध्ये वाढली आहे पालक विद्यार्थी मानसिक तणावाखाली आहे.

वरील विषयाचा मुद्याचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा अन्यथा पालक विद्यार्थी आपणास पूर्व सूचना न देता आंदोलन,उपोषण, रास्ता रोको इत्यादी मार्गाचा अवलंब करतील याची नोंद घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, प्रा. डॉ. सुनील शिंदे, सचिव राम रुद्रे, रामदास पांडे, भाऊसाहेब



वाकचौरे, कैलास तळेकर, अनंत घाणे, सुरेश गबाले, गंगाराम धिंदळे, मोहन मुंडे, गणपत थिगळे, रामदास पवार, अशोक उघडे, प्रमोद मंडलिक, रामहरी तिकांडे, बाळासाहेब बनकर, सखाराम खतोडे, दत्ता ताजणे, ज्ञानेश्वर पुंडे, जालिंदर बोडके, भाऊसाहेब गोरडे, माधवराव तिटमे, प्रकाश कोरडे, राजेंद्र लहामगे,आदींचे नावे आहे. निवेदनाच्या प्रती ना.आशिष शेलार माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. निवासी उपजिल्हाधिकारी तथा पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी, मुख्यमंत्री व सचिवालय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, मा. जिल्हाधिकारी साहेब अहिल्यानगर यांना पत्र मेल ई-मेल द्वारे पाठवण्यात आल्या आहे.

# दादू इंदुरीकर... संगमनेर आणि रघुवीर खेडकर

## 13 जून दादोबांचा स्मृतिदिन

'चला रे गाड्या घ्या संगमनेरला, दोन दिवस गॅप हाये ... थांबू संगमनेरला...' दादोबांचा आदेश सुटायचा आणि तमाशाच्या गाड्या संगमनेरच्या दिशेने वळायच्या. संगमनेर गावाची जादूच अशी आहे की या गावाने सगळ्यांना सामावून घेतलं आहे. महाराष्ट्रातल्या तमाशा विश्वात सर्वाधिक लोकप्रियता लाभलेला एक अस्सल सोंगाड्या म्हणून दादू इंदुरीकर हे नाव परिचित आहे. दादोबा पुणे जिल्ह्यातल्या इंदुरी गावचे पण त्यांना संगमनेरबद्दल प्रचंड आत्मीयता होती. दादासाहेब रुपवते आणि दादोबांचा मोठा स्नेह, सदाशिव रुपवते, दुशिंग सर आणि संगमनेरची अजून बरीच मंडळी ही दादोबांच्या जिवाभावाची माणसं. संगमनेरला आल्यावर नेहरू गार्डन जवळ रघुवीर खेडकर यांचे जुने घर आहे त्याच्या आसपास त्यांच्या गाड्या लागायच्या. दुपारच्या वेळी तमाशातली कलाकार मंडळी कोर्टासमोर गाडेंच्या घरच्या ओट्यावर तर काही डॉ. काटे यांच्या गाडी लावायच्या गॅरेजमध्ये विश्रांतील आडवे व्हायचे.

कांताबाई सातारकर वयाच्या तेराव्या- चौदाव्या वर्षी साताऱ्याला रहात होत्या, तमाशाच्या वेडापायी त्या घरून मुंबईला पळून गेल्या. मुंबईच्या हनुमान थिएटरमध्ये तेव्हा एकाच वेळी दोन तीन तमाशे मुक्कामाला असायचे. कांताबाई जेव्हा हनुमान थिएटरला कामाच्या शोधात पोहचल्या तेव्हा त्यांना सर्वप्रथम आपल्या तमाशात आश्रय दिला, काम दिले ते दादू इंदुरीकर यांनीच.

आज महाराष्ट्रातल्या तमाशा क्षेत्रात नामांकित सोंगाड्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या रघुवीर खेडकर यांनी जेव्हा तमाशात काम करायला सुरुवात केली तेव्हा रंगमंचावरच्या आपल्या



पेहरावात बंडी वापरायला सुरुवात केली, बंडीची ही आयडिया मी दादू मामाकडूनच घेतली हे आजही रघुवीर खेडकर प्रांजळपणे सांगतात.

अवघ्या महाराष्ट्राला खळखळून हसायला लावणाऱ्या दादोबांना आयुष्यात असंख्य संकटांना सामोरं जावं लागलं. व्यावसायिक ईर्षेचा सामना तर करावा लागलाच पण त्यांच्या हितशत्रूंनी त्यांच्या तमाशाचा तंबू जाळून या सोंगाड्याला रडवण्याचं पापही केलं आहे. या बद्दल जुन्या जाणत्या तमाशा कलाकारांकडून खूप ऐकलं आहे. खूप मोठं नावं असलेली माणसे किती स्वार्थी होती, दादोबांना त्यांनी कसा त्रास दिला हे खूप वेदनादायी आहे. महाराष्ट्रात विचारवंत म्हणून वैचारिक लेखक म्हणून ज्यांची ओळख आहे अशा डॉ. रावसाहेब कसबे यांनी मला दोन वेळा एक किस्सा सांगितला होता. प्रभा शिवणेकर म्हणजे गाढवाच लग्न या वग नाट्यातली गंगी. त्या एकदा संगमनेरला असताना अचानक आजारी पडल्या. कसबे सर हेही दादोबांचे चाहते होते, सरांनी लगेच स्वतःची सायकल आणली आणि प्रभा शिवणेकरांना दवाखान्यात नेऊन आणलं.

कांताबाई सातारकर यांच्या धाकट्या भगिनी सुशीलाबाई यांनीही अनेक वर्षे दादू इंदुरीकर यांच्यासोबत तमाशात काम केलं. रघुवीर खेडकर यांनी जेव्हा अगदी सुरुवातीला सोंगाड्या वठवायला सुरुवात केली तेव्हा रघुभाऊला आपल्याच विनोदानंतर हसू यायचं. एकदा दादू इंदुरीकर रघुभाऊचा तमाशा बघायला आले आणि कार्यक्रम संपल्यावर भाऊला जवळ बोलावलं,

'हे बघ रघु सोंगाड्याने फक्त विनोद करायचा .. लोकांनी हसायचं असत, आपण कधीच हसायचं नाही... ' रघुभाऊसाठी हा खूप मोठा धडा होता. आजही रघूभाऊ ही आठवण सांगतात. असे हे संगमनेरकर आणि दादू इंदुरीकर यांचे ऋणानुबंध... आज दादोबा असते तर पुन्हा एकदा म्हटले असते, चला रे गाड्या घ्या संगमनेरला, आपल्या रघुला पद्मश्री पुरस्कार मिळालाय... त्याला भेटून येऊ...

आज १३ जून... दादोबांना जाऊन चार दशके उलटली पण गाढवाचं लग्न म्हटलं की दादोबाच डोळ्यापुढे येतात... संगमनेरवर नितांत प्रेम करणाऱ्या दादू इंदुरीकर या हास्यसम्राटाच्या स्मृतीला विनम्र अभिवादन..

**संतोष खेडलेकर**
इतिहास संशोधक, तमाशा अभ्यासक

# पद म्हणजे प्रतिष्ठा नव्हे, तर जबाबदारी !

गावाचा विकास हा केवळ निधी, योजना किंवा मोठ्या घोषणांवर अवलंबून नसतो. गावाच्या विकासाचा पाया हा गावातील नागरिकांच्या विचारांवर आणि त्यांनी निवडलेल्या नेतृत्वावर उभा असतो. त्यामुळे प्रत्येक गावकऱ्याने आता एक गंभीर प्रश्न स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

**पद कशासाठी ?**

केवळ नावापुढे पद लावण्यासाठी की समाजासाठी काहीतरी सकारात्मक घडवण्यासाठी ? पद म्हणजे प्रतिष्ठा नव्हे. पद म्हणजे जबाबदारी. आपल्या आयुष्यातील कधीही परत न येणारा अमूल्य वेळ, ऊर्जा आणि क्षमता समाजहितासाठी अर्पण करण्याची संधी म्हणजे पद. परंतु आज अनेक ठिकाणी पद, सत्ता, प्रतिष्ठा, गटतट, आडनाव, भाऊबंदकी आणि वर्चस्ववाद हेच विकासाच्या आड येणारे सर्वात मोठे अडथळे ठरत आहेत.

दुर्दैवाने, अनेकदा विकासाला दुय्यम स्थान दिले जाते आणि सत्ता व वर्चस्व टिकवण्याला प्राधान्य दिले जाते. घराचा कारभारी जर व्यसनी किंवा अयोग्य निघाला, तर संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. गाव हे देखील एक मोठे कुटुंबच आहे. मात्र हे कुटुंब चालवण्यासाठी योग्य व्यक्ती निवडण्याकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो. मला हे पद मिळालेच पाहिजे, चेअरमन आमचाच झाला पाहिजे अशा मागण्या केल्या जातात. पण त्या व्यक्तीकडे त्या पदाला न्याय देण्याची क्षमता, वेळ आणि तळमळ आहे का, याचा विचार किती जण करतात ?

एखाद्या पदाची जबाबदारी देताना त्या व्यक्तीचे चारित्र्य, नेतृत्व क्षमता, वैचारिक दृष्टिकोन, दूरदृष्टी, समभाव, प्रामाणिकपणा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांचा विचार होणे आवश्यक



आहे. कारण पदावर बसलेली व्यक्ती केवळ स्वतःचे नव्हे, तर संपूर्ण गावाचे भविष्य घडवत असते. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी हुतात्म्यांनी प्राणांची आहुती दिली. पण आज त्याच देशात काही ठिकाणी सत्ता मिळाल्यानंतर कमिशन, स्वार्थ आणि मतांच्या राजकारणासाठी गावांच्या विकासाचा सौदा केला जातो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. जोपर्यंत गावातील नागरिक गटतट, भाऊबंदकी, आडनाव आणि वर्चस्ववाद यांच्या पलीकडे जाऊन विचार करणार नाहीत, तोपर्यंत गावाचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही. म्हणूनच आता प्रत्येक गावकऱ्याने ठरवावे - व्यक्ती नव्हे, तर तिची पात्रता पाहूया; गट नव्हे, तर गावाचा विकास निवडूया; आणि स्वार्थ नव्हे, तर समाजहिताला प्राधान्य देऊया. आपलं गाव, आपला परिवार - त्याच्या उज्वल भविष्यासाठी योग्य नेतृत्वाची निवड हीच खरी लोकशाही आहे.



**प्रकाश कोटकर**
(माजी सैनिक)स्वराज्य सैनिक संघटना

# संपादकीय...

## बालकामगारमुक्त समाजासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

_जगामध्ये बालकांना कामगार म्हणून राबविले जाऊ नये आणि बालकांना सर्वांगीण विकासाचा हक्क मिळालाच पाहिजे. हा जागतिक बालकामगार विरोधी दिनामागचा मुख्य उद्देश आहे. जागतिक बालकामगार विरोधी दिनाची सुरुवात आंतरराष्ट्रीय कामगार संघटना-आयएलओने १२ जून २००२ रोजी केली. बाल कामगारांच्या जागतिक स्थितीवर लक्ष केंद्रित करणे आणि बालमजुरी पूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे या उद्देशाने जागतिक बालकामगार विरोधी दिन साजरा करण्यात येतो.

प्रत्येक जिल्ह्यात सध्या विशेष प्रशिक्षण केंद्रे विविध वस्त्यांमध्ये कार्यान्वित आहेत. प्रकल्प अधिकारी यांच्या मार्गदर्शनात शेकडो कर्मचारी काम करतात. या प्रकल्पांतर्गत बालकामगारांना विविध कौशल्य विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो. बालकामगारांना अनौपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील कौशल्य व कलागुणांना वाव मिळावा, यासाठी विविध ट्रेडचे व्यवसायपूर्ण प्रशिक्षण देण्यात येते तसेच प्रकल्पाचे कार्य व बालकामगार प्रथेविषयी जनमानसात जनजागृती करण्यात येते. प्रत्येक बालकामगाराला दरमहा १५० रुपये विद्यावेतन देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागामार्फत विद्यार्थी मित्र अभ्यासक्रमाचा विशेष प्रशिक्षण केंद्रात अवलंब करण्यात येतो, शालेय पोषण आहार, पाठ्यपुस्तके आणि आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात, बालकामगारांना त्यांच्या आवडीनुसार तसेच त्यांच्यातील कौशल्यास अनुरूप असे व्यवसाय पूर्ण प्रशिक्षण देण्यात येते, बालकामगारांना विविधांगी उपक्रमातून शिक्षणाची गोडी निर्माण करण्यात येते. तसेच जीवन कौशल्य राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पामार्फत बालकामगारांना जीवन कौशल्य विषयाचा प्रभावी संवाद कौशल्य, स्वत:ची जाणीव, प्रभावी नेतृत्व, निर्णयक्षमता, ध्येय निश्चिती, भावनिक समायोजन, कल्पकता, निरीक्षण निरोगी जीवन यासारख्या विविध विषयांच्या माध्यमातून भावी आयुष्यात सुजाण नागरिक घडविण्याचे प्रयत्न केले जातात. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात प्रकल्पाचे कामकाज सुयोग्यरित्या सुरू आहेत. प्रकल्पाच्या सुरूवातीपासून लक्षावधी बालकामगारांना नियमित शाळेत दाखल करण्यात आले आहे. तसेच प्रकल्पामार्फत बालकामगारांना जन्म दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, संजय गांधी निराधार योजना, सुकन्या योजना, मतदान ओळखपत्र, जीवनदायी योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. यासाठी राज्य शासनाने सन १९८६ सालापासून बालकामगार विरोधी कायदा बनविला असून या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाल्यास भविष्यात बालकामगार होण्यास आळा बसेल.

लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा... असे आपण नेहमी म्हणतो. कारण बालपणीचा काळ सुखाचा आणि आनंदाचा असतो. ना कसली चिंता ना कसली काळजी, मनसोक्त खेळा, हसा, आनंद लुटा... पण असा हा सुखाचा काळ काही मोजक्याच मुलांच्या नशिबात असतो. कारण जेव्हा आपण घराबाहेर पडून समाजात वावरतो तेव्हा पोटाची खळगी भरण्यासाठी सिग्नलजवळ काही वस्तू विकणारी मुले, हॉटेल, बसस्थानक, रेल्वे स्टेशनवर पाणी वाटणारी, टेबल साफ करणारी मुले पाहतो. अशा मुलांना कुठे सुखाचे बालपण अनुभवायला मिळते? कायदा असूनही त्यांचे बालपण हरवत चालले आहे. हेच ते बालकामगार! १४ वर्षांखालील जी मुले स्वत:च्या आणि आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी, रोजगार करतात त्यांना बालकामगार म्हणतात. ज्या वयात शाळेत जावून शिकायचे, खेळायचे, बागडायचे त्या वयात हातात झाडू घेऊन साफ-सफाई करायची, भांडी घासायची, कपडे धुवायचे, विटा उचलायच्या, दगड फोडायचे अशी अनेक कामे करावी लागतात. एकीकडे बोट ठेवलं ती वस्तू विकत घेऊन देणारी हौशी मॉम-डॅड तर दुसरीकडे कामावर पाठविणारी नाईलाज मायबाप. समाजातील हे चित्र कसे बदलेल आणि कोण बदलणार? हा समाजापुढे गहण प्रश्नच आहे. १२ जून हा दिवस देशासह जगात सर्वत्र बालकामगार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. बालकामगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्यावतीने जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविण्यात येत आहे. सन १९८६मध्ये पहिला बालकामगार बंदी आणि नियमन कायदा आला. त्या कायद्यानुसार १४ वर्षांखालील मुलांना मजुरी करणे बेकायदेशीर सांगितले. सन २००२मध्ये बालकामगार थांबविणे किंवा बंदी घालण्याचा सर्वानुमते कायदा मंजूर केला. त्या कायद्यानुसार १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांचे शोषण करणे हा गुन्हा मानला गेला. भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद २३ हा मुलांना धोकादायक उद्योग आणि कारखान्यांमध्ये काम करण्यास परवानगी देत नाही. कलम ४५ अंतर्गत देशातील सर्व राज्यांना १४ वर्षांखालील मुलांना मोफत शिक्षण देणे बंधनकारक ठरविले. जिल्ह्या-जिल्ह्यात २००४ पासून जिल्हधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविले जात आहेत.

# अधिक मासानिमित्त सुकेवाडी येथे त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अधिक मासानिमित्त श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ देवस्थान, सुकेवाडी-खांजापूर येथे आयोजित करण्यात आलेला त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. महाराष्ट्रातील नवकानीफ सिद्धपीठांपैकी सातवे नाथ सिद्धपीठ म्हणून ओळख असलेल्या या पवित्र स्थळी ९ ते १२ जून २०२६ दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



सप्ताहाची घटस्थापना महंत शिवदास महाराज (अग्नेश्वर आश्रम, सुकेवाडी) यांच्या शुभहस्ते करण्यात आली. यावेळी श्री आकाश शशिकांत सातपुते, अशोक महाराज खर्डे, श्री कान्होबा मंदिर समिती, नाथ सेवेकरी मंडळ, भजनी मंडळ तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा भजन, नवनाथ पारायण, हरिपाठ, आरती, हरिकीर्तन व अखंड नामस्मरणाचे कार्यक्रम पार पडले. रात्री विविध भजनी मंडळांच्या जागरणाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

हरिकीर्तन सेवेत ह.भ.प. भागवत महाराज साळवे, ह.भ.प. विनोद महाराज राऊत आणि ह.भ.प. अनंत महाराज काळे यांनी भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. तर सप्ताहाची सांगता शुक्रवार, १२ जून रोजी ह.भ.प. सुनील महाराज भोकनळ (मंगळापूरकर) यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

यानंतर आयोजित महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. महाप्रसादासाठी ग्रामस्थ व दानशूर भाविकांनी तांदूळ, रवा, तेल, गॅस टाक्या व इतर साहित्याचे सहकार्य केले. सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी समस्त ग्रामस्थ, नाथ सेवेकरी मंडळ, भजनी मंडळ व भाविकांनी परिश्रम घेतले. पंचक्रोशीतील भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर तीन दिवस हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला.

# हाजी अहमद बालम इनामदार यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर:- मोमीनपुरा येथील पाटबंधारे खात्याचे निवृत्त कर्मचारी हाजी अहमद बालम इनामदार यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले यांचा जन्म अकोले तालुक्यातील अंबड गावात १९४६ साली झाला होता. त्यांनी पाटबंधारे विभागात २००४ साला पर्यंत नोकरी केली, त्यांच्या कार्यकाळात ते अतिशय जबाबदार व प्रामाणिक कर्मचारी होते, निवृत्ती नंतर त्यांनी अतिशय निस्पृह भावनेने मशिदी मध्ये इबादत केली. त्यांच्या पश्चात ५ मुली व १ मुलगा सलीम इनामदार, पत्नी सूना जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांचा एक नातू ज़ाहेद शेख न्यायाधीश आहेत. त्यांच्या अंत्ययात्रेत शहर तसेच बाहेरून आलेल्या समाज मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

जावक क्रमांक / १७६९/२०२०
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
२ रा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत
आकाशवाणी समोर, सावेडी, अहिल्यानगर
दिनांक ०१/०६/ २६

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्या नगर विभाग, अहिल्यानगर
२ रा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत
आकाशवाणी केंद्रा समोर, अहिल्यानगर

दिनांक: ०१/०६/२०२६

### चौकशीची जाहीर नोटीस

बदल अर्थ क्रमांक: ३३२/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नांव व पत्ता - डॉ. भानुदास डेरे फौंडेशन मु. पो. कऱ्हे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
न्यास नोंदणी क्रं. एफ-६८७५/ अहिल्यानगर

बाबत
श्री. पंढरीनाथ गबाजी गुंजाळ, रा. संगमनेर, जि. अहिल्यानगर..... अर्जदार

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर हे वर नमूद केलेल्या चौकशी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
१) वर नमूद केलेला न्यास अस्तीत्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाचे मालकीची आहे काय ?
अ) जंगम मीळकत (वर्णन).. काही नाही.
ब) स्थावर मोळमत (वर्णन)

१) मे. दुय्यम निबंधक संगमनेर यांचे हद्दीतील मौजे कऱ्हे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील गट नं. ४९९ मधील २ हे. ४०, पो. ख. हे. ०० आर, एव्हढे क्षेत्र, आकार ९६०.०० रुपये, याचो चतु:सीमा :-
पुर्वेस गट - नं. ५००.
पश्चिमेस- गट नं. ४९८. संगम सोवाभावी ट्रस्ट
दक्षिणेस गट नं. ४९९ पैकी डॉ. भानुदास डेरे.
उत्तरेस - शिव नांदुर शिंगोटे.
बाजार मूल्य १३२,४८,०००.००

२) मे. दुय्यम निबंधक संगमनेर यांचे हद्दीतील मौजे कऱ्हे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथील गट नं. ५०० मधील ०१ हे. ५१ आर, पो. ख. हे. ०० आर, एव्हढे क्षेत्र, आकार ६००.०० रुपये, याचो चतु: सोमा :-
पूर्वस - राष्ट्रीय महामार्ग,
पश्चिमेस - गट नं. ४९९.
दक्षिणेस - गट नं. ५००. डॉ भानुदास डेरे
उत्तरेस -शिव नांदूर शिगोटे,
बाजार मूल्य ८३,३५,२००.००

३) मे. दुय्यम निबंधक संगमनेर यांचे हद्दीतील गट नं ४९९ वरील क्रमांक १ या क्षेत्रामध्ये ४ मजली इमारत सामपंचायत मिळकत नं. ६०२ चे खालील प्रमाणे मोजमापाचे बांधकाम केले आहे (आयुवेद महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज, फिजीओथेरेपी महाविद्यालय):
१. तळ मजला याचे क्षेत्रफल २३५८० चौ. फुट - १८८०० चौ. फुट
२. पहीला मजला याचे क्षेत्रफळ २३५८० चो. फुट १८८०० चौ. फुट
३. दूसरा मजला याचे क्षेत्रफळ २३५८० चौ. फुट - १८८०० चौ. फुट
४. तीसरा मजला याचे क्षेत्रफळ २३५८० चौ. फुट १८८०० चौ. फुट
५. चीथा मजला याचे क्षेत्रफळ २३५८० चौ.फुट १८८०० चौ. फुट
एकुण क्षेत्रफळ ९४००० चौ. फुट.
याची चतु:सीमा:
पुर्वेस - गट नं. ५००
पश्चिमेस - गट नं. ४९९
दक्षिणेस मिळकत नं. ६२२ इमारत
उत्तरेस गट नं. ४९९ शिल्लक जागा
बाजार मूल्य २०,७७,७३,१००.००

४) मे. दुय्यम निबंधक संगमनेर यांचे हद्दीतील गट नं. ४९९ वरील क्रमांक १ या क्षेत्रामध्ये ग्रामपंचायत कऱ्हे मिळकत नं. ६२२ मधील तीन मजली इमारत (डॉ भानुदास डेरे फौंडेशन अयुर्वेद कॉलेज) चे खालोल प्रमाणे मोजमापाचे बांधकाम केले आहे:-
१. तळ मजला याचे क्षेत्रफळ १५८३७ चौ. फुट - ५८४६ ची फुट
२. पहीला मजला याचे क्षेत्रफळ ११५३६ चौ. फुट - ४१४० चौ. फुट.
३. दुसरा मजला याचे क्षेत्रफळ ११५४७ चौ. फुट = ५४०५ चौ. फुट
४. तीसरा मजला याचे क्षेत्रफळ २६५० चौ. फुट - १३०० चौ. फुट.
एकूण क्षेत्रफळ १६६९१ चौ. फुट
याची चतु:सीमा :-
पूर्वस - गट नं. ५००
पश्चिमेस - गट नं. ४९९
दक्षिणेस - गट नं. ४९९ पैकी शिल्लक जागा.
उत्तरेस मिळकत नं. ६०२ इमारत
बाजार मुल्य ३,६९,३५८००.००

सदरच्या चौकशी प्रकरणी कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास, अगर पुराव देणे असल्यास त्यांनी लेखी स्वरूपात हि नोटीस प्रसिद्ध यासापासून तीन दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल. व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहिनीशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर विभाग ऑहल्यानगर यांचे शिक्क्यानिशों आज दिनांक ०१/०६/२०२६ रोजी दिली.

लिपिक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्यानगर विभाग अहिल्यानगर

(अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

# पश्चिम बंगालमध्ये इमारतीला आग ४ हजार ईव्हीएम जळून खाक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पश्चिम बंगालमधील एका सरकारी इमारतीला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या आगीत सुमारे ४,००० इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे जळून खाक झाली. हे ईव्हीएम मशिन विधानसभा निवडणुकीदरम्यान वापरली होती. ही माहिती सुवेंदू सरकारमधील मंत्री कौशिक चौधरी यांनी दिली.

या घटनेप्रकरणी एफआयआर दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. दक्षिण कोलकाताच्या अलीपूर भागातील नऊ मजली इमारतीला बुधवारी भीषण आग लागली. या इमारतीत इतर विभागांव्यतिरिक्त दक्षिण २४ परगणा जिल्हा परिषदेचे कार्यालयही होते.


**पाहिजेत**
सार्थक ॲग्रोव्हेट या नामांकित कंपनी करिता
टेलीकॉलर महिला - २
ड्रायव्हर - २
नाशिक पुणे हायवे, छत्रपती चौक, घुलेवाडी, संगमनेर
९५५२५०६३६३

**पाहिजेत**
माऊली ग्रीन सोल्युशन येथे कामासाठी मुले पाहिजेत
सोलर, सीसीटिव्ही, संगणक सिस्टीममध्ये तांत्रिकज्ञान आवश्यक
7588095215
7888095215

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक - पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458

SLH ADVISORS PVT LTD
TAX | ACCOUNTING | CONSULTING
WE ARE HIRING JOIN OUR TEAM
Marketing Executive 05
B.Com./M.Com./MBA, Salary - Rs. 25,000/-
TeleCaller (Female) 02
Graduate Preferred, Salary - Rs. 15,000/-
Digital Marketing Executive 02
Graduate, MBA, Salary - Rs. 20,000/-
SEO, Google Ads, Content Creation Experience
Contact : 7666387377
SLH Advisors Pvt. Ltd., Saish Business Park, Near Kavi Anant Fandi Natyagruha, Sangamner

**पाहिजेत**
मौजे सावरगाव घुले ता. संगमनेर येथे शेतात विहिर खोदण्यासाठी लॉंग बुमचे फोकलॅन मशिन पाहिजे
(सोबत बंद लिफाफ्यात दरपत्रक देणे, योग्य दरपत्रकास काम देण्यात येईल)
- संपर्क -
श्री. राघू सावळेराम जाधव मु. पो. वरूडी पठार, ता. संगमनेर,जि. अ.नगर
मो. ९३७३९६७३६७

**पाहिजेत**
दुकान कामासाठी पुर्ण वेळ माणसे पाहिजेत
मुले - ४ अनुभवास प्राधान्य
आकर्षक पगार दिला जाईल
- संपर्क -
9881155177

**घर विक्रीसाठी आहे**
अकोले-नाशिक बायपास रोड डेरे इंग्लीश शाळेजवळ संगमनेर येथे १५०० चौ फूट उत्तरमुखी २० फुटी रोड टच सर्व सोईनेयुक्त टायटल क्लिअर घर विकणे आहे
आशा पवार
8999362929

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846







**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फॉर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

**हॉटेल अन्नपूर्णासाठी**
मेस व नाष्ट्यासाठी कुक (आचारी) पाहिजे
आकर्षक पगार मिळेल
राजश्री कृषी केंद्रा शेजारी देवगाव रोड, संगमनेर खुर्द
9011326117
7588004655

**पाहिजेत**
इथापे इन्स्टिटयूट करीता खालील पदे भरणे आहेत
अकाऊंटट -३ क्लार्क -३
ड्रायव्हर-३ वॉचमन- ३
तरी संबंधीतांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह समक्ष भेटावे

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

# मंजूर वर्गापेक्षा जादा वर्ग भरवून विद्यार्थ्यांची आर्थिक लूट

## दाखल्यांसाठीची वसुली थांबवा !

## राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे यांचा १ जुलैपासून आमरण उपोषणाचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहर व तालुक्यातील काही स्वयं अर्थसहाय्यित शाळा मंजूर वर्गापेक्षा पुढचे वर्ग बेकायदेशीरपणे भरवून पालक आणि शासनाची फसवणूक करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परवानगी नसतानाही विद्यार्थ्यांचे प्रवेश करून त्यांची आर्थिक लूट केली जात असून, अशा शाळांवर तातडीने कडक कारवाई करावी आणि संबंधित संस्थाचालकांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले असून, १५ दिवसांत कारवाई न झाल्यास १ जुलै २०२६ पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात प्रवीण कानवडे यांनी म्हटले आहे की, संगमनेर शहर व तालुक्यात मोठ्या प्रमाणावर इंग्रजी माध्यमाच्या व स्वयं अर्थसहाय्यित शाळा सुरू आहेत. मात्र, शिक्षण विभागाच्याच माहितीनुसार, यातील बहुतांशी शाळांना शासनाकडून ठरावीक वर्गांपर्यंतच मंजुरी मिळालेली असताना, त्यापेक्षा वरचे वर्ग बेकायदेशीरपणे भरवले जात आहेत.

समाजात शिक्षणाच्या नावाने सज्जनपणाचा बुरखा पांघरायचा आणि पाठीमागे असे बेकायदेशीर वर्ग चालवून पालकांची आर्थिक व मानसिक लूट करायची, हा गंभीर प्रकार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होऊ शकते, असा घणाघात कानवडे यांनी केला आहे.

नुकताच दहावी आणि बारावीचा निकाल लागला असून, शाळा सोडल्याचा दाखला (एल.सी.) आणि गुणपत्रिका देण्यासाठी तालुक्यातील काही नामांकित शाळा पालकांकडून प्रति विद्यार्थी ५०० ते १००० रुपये बेकायदेशीरपणे उकळत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.शिक्षण उपसंचालकांनी असे पैसे न घेण्याचे आणि घेतलेले पैसे त्वरित परत करण्याचे आदेश दिलेले असतानाही, काही मुजोर शाळा शासनाचे नियम धाब्यावर बसवून वसुली करत आहेत. हे पैसे विद्यार्थ्यांना तात्काळ परत मिळावेत, अशी मागणी कानवडे यांनी केली आहे. यामध्ये प्रमुख मागण्या अशा आहेत की, मंजूर वर्गापेक्षा पुढचे बेकायदेशीर वर्ग भरवणाऱ्या शाळांवर तातडीने कडक कारवाई व्हावी. पालकांची फसवणूक करणाऱ्या शाळांच्या संस्थाचालकांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत.

दाखले आणि गुणपत्रिकेसाठी घेतलेले बेकायदेशीर पैसे शाळांनी विद्यार्थ्यांना त्वरित परत करावेत. शासनाने आणि शिक्षण विभागाने या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घ्यावी. पुढील १५ दिवसांत या मागण्यांवर ठोस कारवाई झाली नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने दि. १ जुलै २०२६ पासून उपविभागीय कार्यालय, संगमनेर समोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा प्रवीण कानवडे यांनी दिला आहे. तसेच, या आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या निवेदनावर अशोक काळे ,सरला भुजबळ, प्रसाद गोरे ,गजानन भोसले,दिनेश डफेदार, अमोल मस्के, नितीन अहिरे, गौरव वाळे, प्रसाद काठे, संतोष भुजबळ आदींच्या सह्या आहे.

# वाळूचा डंपर पकडला

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर- पुणे-नाशिक महामार्गालगत असलेल्या गुंजाळवाडी सर्व्हिस रोडवर गुरुवारी (दि.११) रात्री - दहा वाजेच्या सुमारास अवैधरित्या वाळू - वाहतूक करणारा डंपर संगमनेर शहर पोलिसांच्या पथकाने पकडला. यामध्ये १२' लाख रुपयांचा डंपर आणि २० हजार रुपयांची दोन ब्रास वाळू असा एकूण १२ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन पुणे-नाशिक महामार्गालगत असलेल्या गुंजाळवाडी सर्व्हिस रोडवर अवैधरित्या वाळूची वाहतूक करणारा डंपर (क्र.एमएच.१७, सीव्ही. ३५५५) पकडला. यामध्ये १२ लाख रुपयांचा डंपर आणि २० हजार रुपयांची दोन ब्रास वाळू असा एकूण १२ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोकॉ. विजय खुळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संजय कारभारी जेडगुले (वय ४५, रा. वेल्हाळे, ता. संगमनेर) याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## वाढदिवस शुभेच्छा...



किरण गुंजाळ

संस्थापक

आर्या होल डिग्गर

दैनिक युवावार्ता


# मांडवे बुद्रुक येथील शेतकऱ्यांच्या आमरण उपोषणाची तहसीलदाराकडून दोन तासात दखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर -संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक शिवारातील डोमाळे वस्ती येथील गट नंबर ३१६ मधून कायम वहिवाटीचा रस्ता तातडीने खुला करण्यात यावा या मागणीसाठी पवनराजे मारूती डोमाळे, पांडुरंग कोंडीभाऊ डोमाळे, योगेश बाळासाहेब डोमाळे, विलास सोपान ढेंबरे, बाळशिराम कोंडीभाऊ डोमाळे, सुभाष गोविंदा डोमाळे अतिश भाऊसाहेब झिटे या शेतकऱ्यांनी दि. १२ जून रोजी संगमनेर तहसील कार्यालयासमोर सकाळी ११ वाजता आमरण उपोषण सुरू केले होते. तसेच जोपर्यंत आमची मागणी मान्य होत नाही तोपर्यंत आम्ही आमरण उपोषणावर ठाम असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले होते. मात्र अवघ्या काही तासांतच तहसीलदार धीरज मांजरे यांनी या उपोषणाची दखल घेतली. तसेच उपोषणकर्त्यांशी सविस्तर चर्चा करत कायदेशीररीत्या संबंधित रस्त्याचा प्रश्न मार्गी लावू असे तहसीलदार धीरज मांजरे यांनी आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी आपलं आमरण उपोषण मागे घेतले.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून उपोषणकर्त्यांना शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने मोठी अडचण निर्माण होत आहे. तसेच शेतातील माल शेतातून बाहेर आणण्यासाठी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे गट नंबर ३१६ मधून कायम वहिवाटीचा रस्ता तातडीने खुला करण्यात यावे अशी मागणी पवनराजे डोमाळे, पांडुरंग डोमाळे, योगेश डोमाळे, विलास ढेंबरे, बाळशिराम डोमाळे, सुभाष डोमाळे अतिश झिटे या शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली होती. तसेच १० जून पर्यंत सदर कायम वहिवाटीचा रस्ता खुला केला नाही तर आम्ही १२ जून रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा दिला होता. त्यानंतर या शेतकऱ्यांनी आमरण उपोषणाला सुरुवात केली. आमरण उपोषणाला बसल्यानंतर अवघ्या काही तासांतच उपोषणकर्त्यांच्या मागणीची तातडीने दखल घेत निवासी नायब तहसीलदार सुभाष कदम, महसूल नायब तहसीलदार अनुप गिरी यांनी उपोषणस्थळी धाव घेत परिस्थिती समजून घेतली. त्यानंतर तहसीलदार धीरज मांजरे यांच्याशी चर्चा केल्यानंतर काही कायदेशीर प्रक्रिया सुरू असून त्यातूनच संबंधित रस्त्याचा प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन उपोषणकर्त्यांना दिले. शेवटी उपोषणकर्त्यांनी तहसीलदारांच्या विनंतीला मान ठेवून आपलं आमरण उपोषण मागे घेतले.

# महात्म्यांच्या दर्शनाने मानवी जीवन चैतन्यमय होते - ढोक महाराज

## मुलीचा पिता कधीही कमी नसतो तोच खरा दानी





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प. पू. गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहातील रामकथेच्या आठव्या पर्वात रामायणाचार्य ढोक महाराज यांनी आपल्या ओजस्वी, अभ्यासपूर्ण, भावस्पर्शी निरूपणातून रामकथेचे विविध पैलू उलगडत भाविकांना कधी विरहाच्या वेदनेत तर कधी भक्ति रसाच्या अमृतधारेत चिंब भिजविले. त्यांच्या वाणीतील सात्विकता, विचारांची गूढता आणि कथनशैलीतील प्रभावामुळे संपूर्ण धर्ममंडप भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. गगनगिरी महाराजांच्या कृपाशीर्वादाने उभे राहिलेले हे रामकथा सत्संगाचे धर्ममंडप संस्कार, भक्ती आणि अध्यात्माचे विद्यापीठच बनले असल्याचे त्यांनी सांगितले. रामानंदाचार्य, गोविंददेवगिरी महाराज, आत्मामलिक श्रीजंगलीसदगुरू महाराज यांच्यासह अनेक संत महात्म्यांच्या दर्शनाने आशीर्वादामुळे हा आध्यात्मिक सोहळा अधिक तेजस्वी आणि चैतन्यमय होत असून, त्यातून भाविकांना भक्ती, सदाचाराचा अमूल्य संदेश मिळत असल्याचे प्रतिपादन ढोक महाराज यांनी केले.

स्व. जयवंतराव व श्री बाळासाहेब गुंजाळ पाटील गुंजाळ मळा येथे परमपूज्य गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. ढोक महाराज यांनी परशुराम प्रसंगाचे वर्णन आणि महत्त्व सांगत अनेक पिढ्यांचा उल्लेख केला. भगवान परशुरामांनी राम लक्ष्मणांच्या तेज, आज्ञापालन व संस्कारांचे केलेले गौरवपूर्ण वर्णन त्यांनी प्रभावी शब्दांत उभे केले.

कैकयीच्या वरामुळे प्रभू रामांना वनवास भोगावा लागला आणि त्या वियोगाने राजा दशरथांनी अन्नत्याग केला, हा प्रसंग उलगडताना सभागृहातील अनेक भाविकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले. रामकथेतील चौथा दिवस हा वियोगाचा दिवस असतो असे सांगत त्यांनी भक्तांना भावविश्वात नेले. शुभ शकुनांचे महत्त्व स्पष्ट करताना नकुल, हरण, पूजा साहित्य घेऊन जाणारी व्यक्ती, कडेवर बाळ घेतलेली स्त्री, डोक्यावर हंडा घेऊन जाणारी महिला, शेतातील कावळे तसेच मासे विकणारा कोळी यांसारख्या उदाहरणांतून शुभ संकेतांचे विश्लेषण केले. अयोध्येतील श्रीराम मंदिर भूमिपूजनाचा प्रसंग वर्णन करताना कोरोना काळात होम हवन करण्याची संधी मिळाल्याने वेदपाठी ब्राह्मण कसे गहिवरून गेले, याचे भावपूर्ण चित्रण त्यांनी केले.

जनकराजांच्या चार कन्यांच्या विदाईचा प्रसंग कथन करताना महाराज म्हणाले, मुलीचा पिता हा कधीही कमी नसतो; तो दाता असतो. कन्यादान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. सीता, उर्मिला, मांडवी आणि श्रुतकीर्ती यांच्या विदाईचे वर्णन करताना शकुंतला -कण्वमुनी, पार्वती-हिमालय आणि जनकराज यांच्या विरहाची उदाहरणे देत त्यांनी प्रत्येक बापाच्या अंतर्मनातील वेदना शब्दबद्ध केल्या.

मार्गशीर्ष महिन्यातील गोरज मुहूर्त, शुद्ध पक्ष पंचमी, गायीच्या खुराने उडणारी धूळ यांचे आध्यात्मिक महत्त्व सांगत वेळ आणि मुहूर्ताचे जीवनातील स्थान अधोरेखित केले. राम-सीतेच्या विवाहात काही क्षणांचा विलंब झाला असता तर चौदा वर्षांचा वनवास भोगावा लागला असल्याचे त्यांनी वेळेचे महत्त्व पटवून दिले.

अधिक मासातील ज्येष्ठ कृष्ण कमला एकादशीच्या निमित्ताने ४५ हजार भाविकांनी खिचडीचा प्रसाद सेवन केला. संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, कोपरगाव व सिन्नर तालुक्यातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या कथेचे आयोजन गगनगिरी महाराज सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले.

**सध्याच्या विवाह पद्धतीवर भाष्य करताना ढोक महाराजांनी मुहूर्ताकडे होणारे दुर्लक्ष, अनावश्यक खर्च, दिखाऊपणा आणि वधूपित्याला सहन करावा लागणारा मानसिक त्रास यावर परखड शब्दांत टीका केली. गावागावांत 'दांडके मंडळ' स्थापन करून विवाह सोहळ्यांमध्ये शिस्त राखण्यासाठी युवकांची पथके उभी करण्याची सूचना त्यांनी केली. तसेच गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या रामकथेच्या प्रसारासाठी संगमनेरच्या प्रसारमाध्यमांनी केलेल्या योगदानाचे विशेष कौतुक केले.**

# महासागर : पृथ्वीचे सर्वात मोठे आर्थिक इंजिन

महासागर ही पृथ्वीवरील सर्वात मोठी नैसर्गिक संपत्ती आहे. पृथ्वीच्या सुमारे ७० टक्के पृष्ठभागावर पसरलेले महासागर केवळ जलस्रोत नसून हवामान संतुलन, जैवविविधता, अन्नसुरक्षा आणि जागतिक अर्थव्यवस्थेचे प्रमुख आधार आहेत. जागतिक स्तरावर महासागरांचे आर्थिक मूल्य सुमारे २४ ट्रिलियन अमेरिकी डॉलर्स इतके मानले जाते. तरीही महासागरांच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी अत्यल्प निधी उपलब्ध होतो. हवामान बदलाशी संबंधित जागतिक निधीपैकी एक टक्क्यापेक्षाही कमी निधी महासागरांसाठी खर्च केला जातो. त्यामुळे महासागरांचे महत्त्व आणि त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष यामधील तफावत स्पष्टपणे दिसून येते.

जागतिक महासागर दिनाच्या निमित्ताने महासागरांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. अनेक वर्षांपासून महासागरांकडे संसाधनांचे भांडार म्हणून पाहिले गेले. मत्स्यव्यवसाय, वाहतूक, पर्यटन आणि खनिज संपत्ती यासाठी त्यांचा मोठ्या प्रमाणात वापर झाला. मात्र महासागर हे केवळ उपभोगाचे साधन नसून ते पर्यावरणीय आणि आर्थिक स्थैर्याचे सजीव भांडवल आहे. योग्य संवर्धन आणि गुंतवणुकीद्वारे २०५० पर्यंत महासागरांमधून तब्बल १५.५ ट्रिलियन अमेरिकी डॉलर्सचा अतिरिक्त आर्थिक लाभ मिळू शकतो, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

आज 'ब्लू इकॉनॉमी' ही संकल्पना जगभरात वेगाने स्वीकारली जात आहे. शाश्वत मत्स्यव्यवसाय, सागरी संरक्षित क्षेत्रे, ब्लू कार्बन परिसंस्था, किनारी भागातील अक्षय ऊर्जा, सागरी पर्यटन, कचरा व्यवस्थापन आणि नवतंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकासाच्या संधी आहेत. या क्षेत्रांमध्ये केलेली गुंतवणूक पर्यावरण संवर्धनासोबतच रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासालाही चालना देऊ शकते.



महासागरांचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे हवामान बदलाचा वेग कमी करण्यातील त्यांची भूमिका. महासागर दरवर्षी सुमारे २.८ अब्ज टन कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. ही क्षमता मानवनिर्मित कार्बन उत्सर्जनाचा मोठा भाग नियंत्रित करते. महासागरातील जैविक कार्बन पंप ही नैसर्गिक प्रक्रिया वातावरणातील अतिरिक्त कार्बन शोषून घेते आणि पृथ्वीचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करते. त्यामुळे महासागरांचे संरक्षण म्हणजे हवामान बदलाविरुद्धची सर्वात प्रभावी आणि नैसर्गिक लढाई होय.

मात्र महासागरांमधील गुंतवणुकीपुढे अनेक अडथळे आहेत. या क्षेत्रातील प्रकल्प लहान आणि विखुरलेले असल्यामुळे मोठ्या गुंतवणूकदारांना त्यांच्यात अपेक्षित परतावा दिसत नाही. सरकार, वित्तीय संस्था आणि स्थानिक समुदाय यांच्यात आवश्यक समन्वयाचाही अभाव आहे. परिणामी अनेक चांगले उपक्रम निधीअभावी अर्धवट राहतात. विशेषतः विकसनशील देशांमधील किनारी भागांना या समस्यांचा अधिक फटका बसतो. त्यामुळे स्थानिक गरजा आणि जागतिक भांडवल यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी विशेष आर्थिक धोरणांची आवश्यकता आहे.

सागरी संरक्षित क्षेत्रे म्हणजेच 'मरीन प्रोटेक्टेड एरियाज' (एमपीए) महासागर संवर्धनाचे प्रभावी साधन मानले जाते. २०३० पर्यंत महासागराच्या किमान ३० टक्के भागाचे संरक्षण करण्याचे जागतिक उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अशा क्षेत्रांमध्ये सागरी जैवविविधता वाढते, माशांचे उत्पादन सुधारते आणि परिसंस्था अधिक सक्षम बनते. संशोधनानुसार पूर्णपणे संरक्षित क्षेत्रांमध्ये सागरी जीवसंपत्तीचा बायोमास काही वर्षांत अनेक पटींनी वाढू शकतो. त्यामुळे पर्यावरणीय आणि आर्थिक असे दुहेरी लाभ मिळतात.

लहान बेट राष्ट्रे आणि किनारी भागातील समुदाय हवामान बदलाच्या परिणामांना सर्वाधिक सामोरे जात आहेत. समुद्राची वाढती पातळी, चक्रीवादळे, किनारी धूप आणि अतिवृष्टी यामुळे त्यांच्या जीवनमानावर गंभीर परिणाम होत आहेत. विशेष म्हणजे कार्बन उत्सर्जनात त्यांचा वाटा अत्यल्प असतानाही हवामान बदलाचे दुष्परिणाम त्यांनाच जास्त प्रमाणात भोगावे लागत आहेत. त्यामुळे या समुदायांना सक्षम करण्यासाठी वित्तीय मदत, विमा योजना आणि शाश्वत विकास प्रकल्पांची आवश्यकता आहे.

महासागर संवर्धनात सामाजिक न्यायाचाही विचार आवश्यक आहे. किनारी भागातील महिला आणि दुर्बल घटक हवामान बदलामुळे अधिक प्रभावित होतात. त्यामुळे स्थानिक समुदायांचा सहभाग, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरणपूरक उपजीविकेला प्रोत्साहन देणे महत्त्वाचे ठरते. शाश्वत मत्स्यव्यवसाय आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन यामधून आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधता येऊ शकतो.

आज महासागरांसाठी नव्या गुंतवणूक दृष्टिकोनाची गरज आहे. सरकार, वित्तीय संस्था आणि उद्योग क्षेत्र यांनी महासागर संवर्धनाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. हवामान बदल आणि जैवविविधतेचा ऱ्हास या संकटांवर मात करण्यासाठी महासागरांचे संरक्षण अपरिहार्य आहे. महासागर हे केवळ निसर्गाचे वरदान नसून मानवजातीच्या सुरक्षित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीची सर्वात मोठी गुंतवणूक आहेत. त्यामुळे महासागरांचे संरक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज बनली आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जङ्ग डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
पाईल्स (PILES) फिशर (FISSURE) फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005





भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# धांदरफळच्या विकासात 'राजकारण' येणार नाही - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - धर्म, अध्यात्म आणि समाजसेवा यांचा अतूट संबंध असून ग्रामस्थांच्या प्रेम, विश्वास आणि आशीर्वादातूनच जनसेवेची प्रेरणा मिळत असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले. धांदरफळ खुर्दच्या विकासासाठी कोणतेही राजकारण आड येऊ देणार नाही आणि ग्रामस्थांनी ठेवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथे अधिक मासानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यानिमित्त दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार अमोल खताळ व त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून दीपोत्सव साजरा करण्यात आला. तसेच ज्ञानेश्वरी गाथा पारायणाची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी सुदाम महाराज कोकणे, अर्जुन महाराज खताळ, बाळासाहेब खताळ, भागवत बाबा खताळ, विश्वनाथ नवले, सुनील महाराज संगमनेरकर यांच्यासह महिला, पुरुष, युवक-युवती आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले की, धांदरफळमधील सहकारी व ग्रामस्थांनी दिलेले प्रेम, संस्कार आणि पाठबळ यांचे ऋण या जन्मात फेडणे शक्य नाही. लहानपणापासून धर्म आणि अध्यात्माची आवड असल्याने वारकरी संप्रदाय, सप्ताह आणि धार्मिक कार्यक्रमांशी आपले भावनिक नाते जुळले आहे. श्रद्धा आणि सबुरीच्या मार्गाने समाज प्रगती करतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार झाल्यानंतर तालुक्यातील प्रत्येक गावातील धार्मिक, सामाजिक आणि विकासात्मक कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक गावांतील सप्ताह समित्या आणि ग्रामस्थ केवळ उपस्थितीची अपेक्षा व्यक्त करतात, हेच माझ्यासाठी सर्वात मोठे यश आहे. भगव्या ध्वजाचे दर्शन होताच नवचैतन्य मिळते, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले.

सप्ताह समितीच्या नियोजनाचे कौतुक करत त्यांनी सांगितले की, लोकप्रतिनिधी म्हणून जोपर्यंत जबाबदारी आहे तोपर्यंत धार्मिक व सामाजिक उपक्रमांना आवश्यक ते सहकार्य कायम राहील. गावाच्या विकासासाठी, आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धांदरफळ-मिर्झापूर रस्त्याच्या कामासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून भविष्यात धांदरफळ येथील आरोग्य केंद्रात अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तालुक्यातील प्रत्येक गावाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून धांदरफळलाही त्याचा लाभ मिळत राहील, असे त्यांनी नमूद केले.

मी निवडणुकीपुरते राजकारण करतो; मात्र विकासाच्या कामात राजकारण आड येऊ देणार नाही. ग्रामस्थांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास कधीही तुटणार नाही. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी जे काही आवश्यक असेल ते करण्याची जबाबदारी माझी आहे, असे ठाम आश्वासन त्यांनी दिले. ग्रामस्थांनी केलेल्या आगळ्यावेगळ्या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना आमदार खताळ भावूक झाले. मोठमोठ्या कार्यक्रमांत सत्कार झाले असले तरी वारकरी संप्रदाय आणि ग्रामस्थांनी केलेला हा सन्मान आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे, असे ते म्हणाले. शेवटी मारुतीरायाच्या चरणी प्रार्थना करत सप्ताहातून मिळालेल्या ऊर्जेमुळे प्रत्येकाच्या जीवनात सुख, समाधान, उत्तम आरोग्य आणि सर्व मनोकामना पूर्ण होवोत, अशी प्रार्थना त्यांनी केली.

# कोतुळमध्ये गुटखा साठ्यावर पोलिसांचा छापा

## १.३९ लाखांचा मुद्देमाल जप्त, मुख्य विक्रेता फरार



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले -अकोले तालुक्यातील कोतुळ येथे प्रतिबंधित गुटखा विक्रीविरोधात अकोले पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल १ लाख ३९ हजार ४६४ रुपयांचा पानमसाला व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला. या कारवाईदरम्यान ८ घरगुती गॅस सिलिंडर देखील पोलिसांच्या हाती लागले असून, गुटखा विक्रीशी संबंधित मुख्य संशयित मात्र पोलिसांना चकवा देत फरार झाला आहे.

कोतुळ परिसरात मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री होत असल्याच्या तक्रारी व गुप्त माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तीन स्वतंत्र पथके तयार करून कोतुळ गावात धाड टाकण्यात आली.

गुप्त माहितीच्या आधारे मच्छिंद्र देशमुख यांच्या घरालगत असलेल्या एका गाळ्याची झडती घेतली असता, तेथे डायरेक्टर, रॉयल पान मसाला तसेच विविध प्रकारचा सुगंधी तंबाखू मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवलेला आढळून आला. पोलिसांनी संपूर्ण मुद्देमाल जप्त करत पंचनामा केला.

चौकशीदरम्यान संबंधित गाळ्याच्या मालकाने हा गाळा समीर काझी याला भाड्याने दिला असल्याचे सांगितले. तसेच गुटखा विक्रीचा व्यवसाय तोच करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर पोलिसांनी समीर काझीचा शोध सुरू केला; मात्र तो घटनास्थळावरून पसार झाल्याचे समोर आले आहे. दरम्यान, अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार अकोले पोलीस ठाण्यात दाखल झाले असून त्यांनी जप्त करण्यात आलेल्या मालाची पाहणी केली. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

कोतुळ व परिसरात प्रतिबंधित गुटख्याचा व्यवसाय राजरोसपणे सुरू असल्याच्या तक्रारी यापूर्वीही अनेकदा समोर आल्या होत्या. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, फरार संशयिताला अटक करण्यासाठी पोलिसांची शोधमोहीम सुरू आहे.

# महाराष्ट्रात धो - धो पाऊस

## पंजाबराव डख यांचा पावसाचा अंदाज?

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यात मान्सूनचं आगमन झालं आहे. मात्र तरी देखील संपूर्ण महाराष्ट्र अजूनही मान्सूनने व्यापलेला नाहीये. येत्या १५ जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होईल असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. सध्या स्थितीमध्ये राज्यातील काही भागांमध्ये पाऊस सुरू आहे, तर काही भागांमध्ये अजूनही पाऊस झालाच नाहीये. शेतकऱ्यांचे डोळे मान्सूनच्या पावसाकडे लागले आहेत. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाअभावी पेरण्यांचा खोळंबा झाला आहे.

महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला आहे, परंतु तरी देखील अजूनही अनेक भागांमध्ये पाऊस झालेलाच नाही. मान्सूनच्या पावसाला ब्रेक लागल्याचं पहायला मिळत आहे. मात्र तेरा जूनपासून पुन्हा एकदा राज्यात पावसाला सुरुवात होणार आहे. १३ जून ते २० जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. परंतु या पावसाचं प्रमाण हे एक दिवसाआड असं राहील, म्हणजे एक दिवस पाऊस पडेल, दुसऱ्या दिवशी पाऊस पडणार नाही, असं या पावसाचं स्वरुप असेल. यंदा राज्यात तीन टप्प्यात पेरण्या होतील, पहिला टप्पा असेल एक ते सात जूनचा तर या काळात केजच्या पलिकडच्या भागामध्ये काही ठिकाणी पाऊस चांगला झाल्यानं त्या भागात तसेच सातारा, सांगली जिल्ह्यातील काही भागांमध्ये पेरण्याला सुरुवात झाली आहे. तर दुसऱ्या टप्प्यामध्ये राज्यात २० जून ते ३० जून या दरम्यान एक दोन मोठे पाऊस होतील, त्यावेळी पेरणीचा दुसरा टप्पा होईल, राज्यात सामान्यपणे दरवर्षी मुंबईकडून पाऊस येतो, परंतु यावर्षी पावसाने दिशा बदलली आहे.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्सपर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करू नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
※ कर्ज रक्कम वाढ । ※ कर्ज व्याजदर कमी । ※ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
♦ मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
♦ गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
♦ वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
♦ गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
♦ गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोगा विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैथूनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
बेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25